महाराष्ट्र शासन

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई

८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.

दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org


क्र.तंशिप्र-१२२४/प्र.क्र.०३/सीईटी/२०२४/ 1934 दिनांक-२४/१०/२०२४.

## महत्वाची सूचना

**बी.बीसीए/बीबीए/बीएमएस/बीबीएम/ एमबीए इंटीग्रेटेड/ एमसीए इंटीग्रेटेड**

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातंर्गत असलेल्या तंत्रशिक्षण विभागातील बी.बीसीए/बीबीए/बीएमएस/बीबीएम/ एमबीए इंटीग्रेटेड/ एमसीए इंटीग्रेटेड या पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरु आहे. सदर प्रवेश प्रक्रियेची तिसरी फेरी संपन्न झाल्यानंतर उर्वरीत राहिलेल्या रिक्त जागा व संस्थास्तरावरील जागांच्या प्रवेश प्रक्रियेसंदर्भात सदरील अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेसाठी प्रसिध्द करण्यात आलेल्या माहिती पुस्तिकामधील मुद्या क्रमांक १३ (पदवी व पदव्युत्तर पदवी माहिती पुस्तिका २०२४-२५ पृष्ठ क्र. ८४) अन्वये नियम/ सुचनांचे तंतोतंत पालन करुन संस्थेने प्रवेश प्रक्रिया राबविण्यात यावी.

वरील परिच्छेदेमध्ये नमूद केलेले पदवी व पदव्युत्तर पदवी प्रवेश प्रक्रियेच्या माहिती पुस्तिकामधील मुद्या क्रमांक १३ अन्वये नियम / सूचनांचे पालन करुन प्रवेश प्रक्रिया गुणवत्तेनुसार प्रवेश प्रक्रियेच्या शासनमान्य नियमानुसारच राबविण्यात यावी. तसेच विद्यार्थ्यांनी केलेल्या अर्जांची यादी व त्यांची अंतिम गुणवत्ता यादी (Final Merit List) संस्थेच्या संकेतस्थळावर त्याच दिवशी प्रसिध्द करण्यात यावी आणि सीईटी कक्षाच्या माहितीकरीता सदरील यादी ई-मेलद्वारे पाठवावी.

तसेच TFWS आणि EWS या कोट्यातील जागा केवळ केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे भरण्यात येत असून या कोट्यातील रिक्त राहिलेल्या जागा संस्थास्तरावर भरण्यात येवू नये.

सदरील संस्थास्तरावरील प्रवेश प्रक्रिया नियमबाह्य झाल्याने न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास सर्व जबाबदारी संस्थेची राहील. तसेच नियमबाह्य प्रवेश प्रक्रिया रद्द करण्यात येईल, याची सर्व संस्थांनी नोंद घ्यावी.

**आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी**
**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**